जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २४५ | मंगळवार, ३१ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### एक एप्रिलपासून नवे नियम लागू

**मुंबई, ता. ३० :** १ एप्रिल २०२६ पासून नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात होणार असून त्यासोबतच अनेक नवे नियम लागू होतील. ही डेडलाईन चुकल्यास केवळ दंडच भरावा लागणार नाही, तर तुमचे बँक खाते किंवा गुंतवणूक 'फ्रीज' होण्याचाही धोका आहे.एक जबाबदार करदाता म्हणून तुम्ही ३१ मार्चपूर्वी कोणती पाच महत्त्वाची कामे पूर्ण करायला हवीत, ते जाणून घेऊयात. तुमच्याकडे पीपीएफ किंवा सुकन्या समृद्धी योजनेचे खाते असेल, तर त्यात किमान रक्कम जमा करणे अनिवार्य आहे. पैसे जमा न केल्यास तुमचे खाते 'डिफॉल्ट' श्रेणीत जाते. गृहकर्ज घेतलेल्यांसाठी मार्च महिना फायद्याचा ठरू शकतो. कर भार कमी करायचा असेल, तर ३१ मार्चपूर्वी काही रक्कम भरून टॅक्स डिडक्शनचा लाभ घेऊ शकता. पेन्शन योजनेत तुमचे टियर-१ खाते सक्रिय ठेवण्यासाठी वर्षाला किमान १,००० रुपये गुंतवणे आवश्यक आहे. शिवाय, कलम ८० सीसीडी (१बी) अंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंतची अतिरिक्त कर सवलत मिळवण्यासाठी ही गुंतवणूक करण्याची ३१ मार्च ही शेवटची तारीख आहे.

# शिंदवणेत कोथिंबीर पिक मातीमोल

## ३० हजारांचा खर्च अन् एक रुपयांचा भाव

## शेतकऱ्यावर पिकात बकरी व मेंढ्या सोडण्याची वेळ

**उरुळी कांचन, ता. ३० :** कधी निसर्गाचा लहरीपणा, तर बाजारभावाचा अस्थिरपणा जणू बळीराजाच्या पाचवीलाच पुजलेला आहे. यंदाच्या वर्षी अशीच काहीशी प्रचिती बळीराजाला आली आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर बाजारपेठेत तेजी येण्याऐवजी कोथिंबीर आणि कांद्याचे भाव रसातळाला गेल्याने शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे.

कोथिंबिरीला अवघा एक रुपया बाजारभाव मिळत असून, अनेक ठिकाणी व्यापारी फुकटदेखील माल घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे पदरचा खर्चही निघत नसल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी कोथिंबिरीच्या उभ्या पिकात बकरी आणि मेंढ्या सोडण्याची अत्यंत वाईट वेळ आली आहे. बाजारात मालाची आवक भरपूर असतानाच दुसरीकडे गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यावसायिकांनी आपले हात आखडते घेतले आहेत.

इंधन टंचाईमुळे हॉटेलमधील मागणी घटल्याचा थेट परिणाम कोथिंबीर आणि इतर पालेभाज्यांच्या विक्रीवर झाला आहे. हॉटेल चालक माल



उचलत नसल्याने व्यापाऱ्यांनीही खरेदी बंद केली आहे, परिणामी शेतकऱ्यांचा शेकडो टन माल शेतातच सडून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

केवळ कोथिंबीरच नाही, तर कांदा उत्पादक शेतकरीही मेटाकुटीला आला आहे. कांद्याला मिळणारा भाव आणि काढणीसाठी लागणारा मजुरीचा खर्च याचा मेळ बसत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. बी-बियाणे, खते, औषध फवारणी आणि मजुरी असा एकरी हजारो रुपये खर्च करूनही हातात छदामही पडत नसल्याने बळीराजा हताश झाला आहे. रात्रंदिवस कष्ट करून पीक उभे केले, पण आता त्याला कोणी वाली उरला नाही. बाजारात नेण्याचा वाहतूक खर्चही खिशातून द्यावा लागत असेल, तर माल विकायचा कोणाला? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.

कोथिंबिरीची काढणी करण्यापेक्षा ती जनावरांना चारणे किंवा शेतातच नांगरणे शेतकऱ्याला सोयीचे वाटू लागले आहे, यातच या भीषण परिस्थितीचे गांभीर्य दडलेले आहे.

### व्यापाऱ्यांची पाठ अन् गॅस टंचाईचा फटका

बाजारपेठेत कोथिंबिरीला उठाव नसल्याचे कारण देत व्यापाऱ्यांनी माल खरेदी करण्यास नकार दिला आहे. कोथिंबीर काढायला मजूर लावला तर मजुरीचे पैसेही निघत नाहीत, मग विकायची कोणाला? असा उद्विग्न सवाल शेतकरी विचारत आहेत. त्यातच सध्या जाणवत असलेल्या गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यावसायिकांनी आपली मागणी निम्म्यावर आणली आहे. हॉटेलमधून मागणी घटल्याने पालेभाज्यांचे मार्केट कोसळले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

> बाजारभावाचा काहीच भरवसा राहिला नाही. ३० हजार खर्च करून हाताशी आलेल्या पिकाला आता काढायलाही परवडत नाही. पीक कसं पिकवायचं हे आमच्या हातात आहे, पण त्याला भाव मिळणं आमच्या नशिबात नाही.
>
> - **सचिन विठ्ठल महाडिक,** प्रगतशील शेतकरी, शिंदवणे, ता. हवेली

### ३० हजारांचा खर्च अन् १ रुपयांचा भाव!

सचिन महाडिक यांनी मोठ्या आशेने आपल्या दीड एकर क्षेत्रात कोथिंबीर लागवड केली होती. बियाणे, पेरणी, महागडी औषधांची फवारणी आणि मजुरी असा एकूण ३० हजार रुपयांचा खर्च त्यांनी या पिकावर केला. पीक काढणीला आले तेव्हा बाजारात कोथिंबीरीला केवळ १ रुपया असा निचांकी भाव मिळू लागला.

### पुण्यात वन सर्वेक्षकाला ४ लाखांची लाच घेताना एसीबीने रंगेहात पकडले

**पुणे, ता. ३० :** पुणे वन विभागातील कथित लाचखोरीचा मोठा प्रकार उघडकीस आला असून, वनक्षेत्र सर्वेक्षक उदयसिंग भिमराव कुंभार (वय ४६) यांना ४ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. ही कारवाई २९ मार्च २०२६ रोजी करण्यात आली.तक्रारदार हे जमीन खरेदी-विक्री व्यवसायात कार्यरत असून, वडगाव मावळ तालुक्यातील चिखलसेगाव, आपटी आणि कुनेगामा येथील काही जमिनींच्या सात-बारा उताऱ्यांवरील खाजगी वनाचे शेरे काढण्यासाठी त्यांनी संबंधित कार्यालयात अर्ज केला होता. महसूल विभागाने यासंदर्भात पुनर्स्थापित आदेश दिले होते. ४ मार्च २०२६ रोजी तक्रारदारांनी कार्यालयात चौकशी केली असता संबंधित काम कुंभार यांच्याकडे असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर कुंभार यांनी ११ आदेशांच्या प्रती देण्यासाठी ७ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रारदारांनी १३ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली.पडताळणीत लाच मागणीचा प्रकार निष्पन्न झाल्यानंतर विभागाने सापळा रचला. २९ मार्च रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अरणेश्वर चौक परिसरात, सार्वजनिक रस्त्यावर कुंभार यांनी तक्रारदाराकडून ४ लाख रुपये स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

# शरद पवार लवकरच करणार राज्याचा दौरा

**पुणे, ता. ३० :** आरोग्याच्या कारणामुळे जवळपास तीन महिन्यांच्या विश्रांतीनंतर शरद पवार पुन्हा राजकीयदृष्ट्या सक्रिय होण्याच्या तयारीत आहेत. शरद पवार पुढील दोन आठवड्यांत राज्यव्यापी संपर्क अभियान सुरू करण्याची तयारी करत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची पुन्हा उभारणी करण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हिंदुस्थान टाईम्सने याबाबत वृत्त दिले आहे.

अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाला मोठा फटका बसला असून सत्ताधारी अजित पवार गट आणि इतर पक्षांकडे मतदारांचा कल वाढल्याचे दिसून आले. त्यामुळे पक्ष संघटना तळागाळापासून मजबूत करण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती वरिष्ठ नेत्यांनी दिली.

थोड्या विश्रांतीनंतर पवार साहेब लवकरच पुन्हा सक्रिय होणार आहेत. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे आणि पक्षाची पुनर्बांधणी हेच प्राधान्य असेल, असे एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले. या दौऱ्याचाच भाग म्हणून ३० मार्च रोजी स्थानिक निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या प्रतिनिधींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर ३१ मार्च ते २ एप्रिलदरम्यान मुंबईत जिल्हानिहाय संघटनात्मक बैठका घेण्यात येणार आहेत.



शशिकांत शिंदे यांनी या निवडणुकांतील यशाला नैतिक विजय असे संबोधले. पैशाचा प्रभाव आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात आम्ही लढलो. आमच्या उमेदवारांच्या यशातून जनतेचा विश्वास आणि लोकशाही मूल्यांप्रती बांधिलकी दिसून येते, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, पवार यांच्या पुनरागमनासोबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबतच्या चर्चांनाही वेग आला आहे. सत्ताधारी गटाचे आमदार सुनील शेळके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली. दोन्ही गट एकत्र आल्यास कार्यकर्ते आणि नेत्यांना फायदा होईल, असे त्यांनी म्हटले. मात्र, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत चर्चा झालेली नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. उपसभापती अण्णा बनसोडे यांनीही विलिनीकरणाचे स्वागत केले जाईल, असे मत व्यक्त केले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी विलिनीकरणाचा अंतिम निर्णय हा सुनेत्रा पवार यांच्यावर अवलंबून असल्याचे सांगितले.

### पुण्यात १४ एप्रिल पासून ७४ अतिरिक्त बस धावणार

**पुणे, ता. ३० :** पुणे एसटी विभागाने उन्हाळी सुट्ट्यांमध्ये होणारी प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १४ एप्रिल ते १० जून २०२६ या कालावधीत सुमारे ७४ अतिरिक्त बस सेवा सुरू करण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि कामगार मोठ्या प्रमाणात आपल्या गावी जाण्यासाठी प्रवास करतात. त्यामुळे नियमित बस सेवांवर ताण वाढतो, हे लक्षात घेऊन ही अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे. या जादा बस सेवा अक्कलकोट, तासगाव, कोल्हापूर, पंढरपूर, जळगाव, कळण, सप्तशृंगी, अकोला, अहमदपूर आणि गोंदवले या प्रमुख मार्गांवर चालवण्यात येणार आहेत. प्रवाशांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे एसटी विभागाने केले आहे. त्यामुळे प्रवास अधिक सोयीचा आणि कमी गर्दीचा होईल, अशी अपेक्षा आहे.


# खेड- शिवापूर टोलनाक्यावर एसटी चालकावर हल्ला

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. ३० : खेड शिवापूर टोलनाक्यावर एसटी बस चालकावर मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणल्याची गंभीर घटना समोर आली असून या प्रकरणी राजगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जयराम तुकाराम मोटघरे (वय ३४, व्यवसाय एसटी बस चालक, रा. भोर, जि. पुणे) यांनी तक्रार दिली आहे. दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास खेड शिवापूर टोलनाका, सातारा ते पुणे लेन येथे ही घटना घडली.

या वेळी आरोपी रूपेश ज्ञानेश्वर राउत (रा. वडगाव बु।।, पुणे) हा त्याच्या स्कॉर्पिओ कारने आला



होता. बसचा आपल्या वाहनाला धक्का लागल्याचा संशय घेऊन त्याने एसटी बस अडवली. त्यानंतर चालकाच्या बाजूचा केबिन दरवाजा उघडून आत घुसत चालकाला शिवीगाळ, दमदाटी करत हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावेळी रस्त्यात कोठेही भेटलास तर पाहून घेईन अशी धमकी देत चालकाला धाक दाखवण्यात आला. या प्रकारामुळे चालकाच्या शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण झाला असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी राजगड पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.

# भारत-इंग्लंड सेमी फायनलच्या तिकिटांची काळाबाजार

## मुंबईतील माजी क्रिकेटपटूला अटक

**मुंबई, ता. ३० :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ दरम्यान भारत आणि इंग्लंड यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये खेळल्या गेलेल्या उपांत्य सामन्याच्या तिकिटांच्या काळाबाजार प्रकरणात मुंबई पोलिसांनी माजी क्रिकेटपटूला अटक केली आहे. या प्रकरणात मुंबई अंडर-१९ संघासाठी खेळलेला बलवंत सिंह उर्फ स्वरूप सिंह सोढा (वय २६) याला सातवा आरोपी म्हणून अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, सोढा याचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला असून तिकिटांच्या स्रोताचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. या काळाबाजार रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.




या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत २४ तिकिटे जप्त केली असून मुंबई क्रिकेट असोसिएशनला पत्र पाठवून तिकिटांचे वाटप कसे करण्यात आले याबाबत माहिती मागवली आहे. तपासात उघड झाले की, सोढा याने २५ हजार रुपयांना दोन तिकिटांची विक्री केली होती. मात्र त्याला ही तिकिटे कशी मिळाली, याबाबत त्याने अद्याप स्पष्ट माहिती दिलेली नाही. पोलिसांनी सोढा विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३१८ अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. सोढा २०१९ मध्ये मुंबई अंडर-१९ संघाकडून खेळला होता आणि त्यानंतर तो प्रशिक्षक (कोच) म्हणून काम करू लागला होता. सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंसोबत त्याने क्रिकेट खेळल्याचेही पोलिसांनी सांगितले. स्वतःच्या ओळखीचा वापर करून सोढा काळाबाजाराच्या रॅकेटमध्ये सहभागी झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# उरुळी कांचनच्या डॉक्टरांनी अपघातग्रस्त दाम्पत्याला वाऱ्यावर सोडले

## मदतीऐवजी आरेरावी करत झाले पसार; भिगवण येथे घडला प्रकार

**उरुळी कांचन, ता. ३० :** समाजात ज्यांना देवदूत मानले जाते, त्याच वैद्यकीय पेशावर डाग लावणारी संतापजनक घटना भिगवण (ता. इंदापूर) येथे घडली आहे. उरुळी कांचन (ता. हवली) येथील एका नामांकित डॉक्टरांनी आपल्या लाल रंगाच्या स्कोडा गाडीने वयोवृद्ध दाम्पत्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ही घटना भिगवण ग्रामपंचायत हद्दीतील राशीन-भिगवण रस्त्यावरील अंबिका मच्छी खानावळ परिसरात रविवारी (ता. १५) सायंकाळी साडेचारच्या



सुमारास घडली.

दरम्यान, अपघातातील जखमींना मदत करण्याऐवजी केवळ हातावर ५०० रुपये ठेवून आरेरावी करत डॉक्टर घटनास्थळावरून पसार झाल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे हे विठ्ठला, या डॉक्टरला आतातरी सद्बुद्धी दे, अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरात ऐकू येत असून, या प्रकरणाने पूर्व हवेलीतील नागरिकांमध्ये तीव्र चर्चा रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित डॉक्टर कामानिमित्त भिगवण येथे गेले होते. परतताना त्यांच्या चारचाकीने दुचाकीवरून जाणाऱ्या वयोवृद्ध पती-पत्नीला जोरदार धडक दिली. धडकेमुळे दोघेही रस्त्यावर कोसळले. या अपघातात पत्नीच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली, तर पतीलाही मोठा मुका मार बसला. दुचाकीचेही मोठे नुकसान झाले.

अपघातानंतर परिसरात बघ्यांची गर्दी जमली. मात्र, जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्याऐवजी डॉक्टरांनी गाडीतून उतरून त्यांच्या हातावर केवळ ५०० रुपये टेकवले आणि उलट आरेरावीची भाषा केल्याचे नातेवाईकांनी सांगितले आहे. एवढेच नव्हे, तर माझे नातेवाईक पोलीस अधिकारी आहेत, असा दम देत कोणतीही वैद्यकीय मदत न देता त्यांनी घटनास्थळावरून गाडी काढून घेतली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

डॉक्टर हे जीव वाचवणारे असतात; पण या डॉक्टरांच्या वागणुकीमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राची मान खाली गेली आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर जखमी दाम्पत्याच्या नातेवाईकांमध्ये संतापाचे वातावरण असून, या बेजबाबदार डॉक्टरांवर नेमकी कारवाई होणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दौंडमध्ये टेम्पो अडवून चालकासह चौघांवर हल्ला; ५ जणांवर गुन्हा दाखल

**दौंड, ता. ३० :** गाई वाहतूक करत असल्याच्या संशयावरून काही तरुणांनी टेम्पो अडवून चालकासह चार जणांना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना दौंड शहरातील भाजीमंडई परिसरात २७ मार्चला घडली. या हल्ल्यात चालकाचा हात फ्रॅक्चर झाला असून आरोपींविरुद्ध जबरी मारहाण, लूट व धमकी यांसह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे दौंड परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे

याप्रकरणी टेम्पो चालक शाहरुख नूर शेख (वय ३०, रा. लोहीया नगर, स्वारगेट, पुणे) यांनी दौंड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रुद्राक्ष लवटे, सुरेश पालवे (दोघे रा. गोपाळवाडी), सोनू थोरात (रा. गांधी चौक), संकेत दळवी (रा. मोरेवस्ती, लिंगाळी) व एका अनोळखी इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११९(१), १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शाहरुख शेख हे टेम्पो चालक असून २७ मार्च रोजी दुपारी त्यांना टेम्पो मालकाचा फोन आला होता. भरतगाव (ता. दौंड) येथून जर्सी गाई चापडगाव (ता. कर्जत, जि. अहमदनगर) येथे नेण्याचे भाडे मिळाल्याने त्यांनी एम एच-१२ केपी-५१९९ क्रमांकाचा टेम्पो घेऊन प्रवास सुरू केला. गाई खरेदीदार मंगेश सोनवणे व त्यांचे



मित्र प्रतीक नागटिळक यांना सोबत घेऊन त्यांनी भरतगाव येथून नऊ जर्सी गाई टेम्पोमध्ये भरल्या व दौंड मार्गे चापडगावकडे निघाले.

रात्री सुमारे ११ वाजता दौंड शहरात आल्यानंतर त्यांचा रस्ता चुकला आणि टेम्पो भाजीमंडई परिसरात गेला. तेथे काही जणांनी टेम्पो थांबवून चौकशी सुरू केली. टेम्पोमध्ये गाई असल्याचे समजताच, संशयितांनी चालक व सोबत असलेल्या तिघांवर शिवीगाळ करत गाई कत्तलीसाठी नेत आहात असा आरोप केला. त्यानंतर एका आरोपीने शाहरुख शेख यांच्या डाव्या हातावर लाकडी दांडक्याने मारहाण केली, तर इतरांनी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या मारहाणीत शेख यांच्यासह मंगेश सोनवणे, प्रतीक नागटिळक आणि टेम्पो मालक रेहान शेख यांनाही दुखापत झाली. मारहाणीदरम्यान एका आरोपीने शाहरुख शेख यांच्या हातातील पांढऱ्या धातूची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली तसेच त्यांच्या शर्टच्या खिशातील १ हजार ३०० रुपयेही हिसकावून घेतले आहेत. आरोपींनी शिवीगाळ व दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर जखमींनी दौंड पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तातडीने सरकारी रुग्णालयात उपचारासाठी पाठवले. शाहरुख शेख व रेहान शेख यांना अधिक मार लागल्याने त्यांना पुढील उपचारासाठी बारामती येथील वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. तेथे करण्यात आलेल्या एक्स-रे तपासणीत शाहरुख शेख यांच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर असल्याचे निदान झाले.

या प्रकरणात पोलिसांनी सामूहिक मारहाण, जबरी चोरी, धमकी व कायद्याला हात घालणे यांसारख्या गंभीर स्वरूपाच्या कलमांखाली आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार गजानन शिंदे करत आहेत.

## संक्षिप्त

### बॅनरवरील फोटोतून आमची निष्ठा ठरवू नये : मंत्री आदिती तटकरे



**रायगड, ता. ३० :** राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या मतदारसंघांमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात लावण्यात आलेल्या बॅनरची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. या सत्कार समारंभाला सुनील तटकरे यांच्या सोबतच मंत्री आदिती तटकरे देखील उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी लावलेला पोस्टरवर सुनील तटकरे, आदित्य तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांचे फोटो लावण्यात आले होते. मात्र दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे फोटो नसल्याने तटकरे यांच्यावर जोरदार टीका होतीय. यावर मंत्री अदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया दिलीय. अदिती तटकरे यांनी याबाबत दिलगिरी करत बॅनरवरील फोटोतून आम्हा सगळ्याच कार्यकर्त्यांची निष्ठा ठरवू नये असं म्हटलंय. तसेच फोटो लावण्यात आला नसल्यानं दिलगिरी व्यक्त केली मात्र काकींना पक्षाच्या कुटुंबप्रमुख म्हणून आमच्या चुकीबद्दल आमचे कान पकडण्याचा अधिकार आहे असं म्हणत टीकाकारांना उत्तर दिलंय.

### खरातच्या मोबाइलमधील डेटा पाहून पोलिसांनाही धक्का

**नाशिक, ता. ३० :** अशोक खरात प्रकरणी तपासात विविध माहिती समोर येतीय. अशोक खरातची एसआयटीकडून चौकशी सुरु आहे. या चौकशीत आणखी एक धक्कादायक पोलिसांच्या हाती लागलीय. अशोक खरातचा लॅपटॉप, मोबाइलसह विविध कागदपत्रेही पोलिसांनी ताब्यात घेतले होते. खरातच्या या मोबाइलमधून अनेक धागेदोरे समोर येतायेत. अशोक खरातच्या मोबाइलमध्ये अडीच हजारांहून अधिक नंबर कोडवर्डमध्ये सेव्ह असल्यानं या प्रकरणाचा तपास अधिक गूढ बनलाय. खरातचे दोन मोबाइल जप्त करण्यात आले असून, त्यातील डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहे. मोबाइलमध्ये प्रभावशाली व्यक्तींची नावं डमी स्वरूपात सेव्ह करण्यात आल्याचा संशय आहे. तर अशोक खरातने पीडित महिलांचे नंबरही सेव्ह केलेले नाहीय. त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी तो वेगळ्या मोबाइलचा वापर करत होता, अशी माहितीही समोर येतीय त्यामुळे या प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळालंय.

### पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडीत फुट?

**पश्चिम बंगाल, ता. ३० :** पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने २८४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. बंगालमध्ये एकूण २९४ जागा असून काँग्रेस या ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवत आहे. मात्र १० जागांसाठीचे उमेदवार अद्यापह जाहीर केले नाहीये. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसने ज्येष्ठ नेत्यांना संधी दिली असून अधीर रंजन चौधरी हे ३० वर्षानंतर ते विधानसभा निवडणूक लढवत आहेत. मागच्या विधानसभा निवडणुकीवेळी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसची युती होण्याची चर्चा सुरू होती. मात्र ममता बॅनर्जी यांनी युती करण्यास नकार दिल्याने काँग्रेस त्यावेळी देखील स्वबळावर निवडणूक लढवली होती.

## महसूल भ्रष्टाचारावर पुरावे द्या, सरकार कारवाई करेल; बावनकुळे यांचे वडेट्टीवारांना आव्हान

**नागपूर, ता. ३० :** माध्यमां समोर वक्तव्य करून काही होणार नाही. जर खरोखर चौकशी हवी असेल, तर मुख्यमंत्र्यांकडे किंवा संबंधित यंत्रणेकडे पुरावे द्यावेत, महसूल विभागातील कथित भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांना खुले आव्हान देत ठोस पुरावे सादर करण्याचे आवाहन केले.

विजय वडेट्टीवार सह विरोधी पक्षातील नेत्यांनी प्रसार माध्यमां समोर वक्तव्य करून काही होणार नाही. जर खरोखर चौकशी हवी असेल, तर मुख्यमंत्र्यांकडे किंवा संबंधित यंत्रणेकडे पुरावे द्यावेत. कोणताही अधिकारी दोषी आढळल्यास त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल,



असे त्यांनी स्पष्ट केले.

बावनकुळे म्हणाले की, केवळ प्रसिद्धीसाठी संवेदनशील प्रकरणांवर वक्तव्य करणे योग्य नाही. अशा बोलण्यामुळे चौकशी यंत्रणांवर दबाव येऊ शकतो, याचीही काळजी घ्यावी. कोणत्याही अधिकाऱ्याच्या कुटुंबाबद्दल बोलणे चुकीचे आहे. गोपनीय माहिती असल्यास ती सरकारकडे द्यावी, असे त्यांनी सांगितले.

खरात प्रकरणाबाबत अधिक बोलण्यास त्यांनी नकार देत, हे अतिसंवेदनशील प्रकरण आहे. चौकशी यंत्रणा आपले काम करत आहे. अशा प्रश्नांमुळे तपासात अडथळा येऊ शकतो, असे म्हटले. मोहित कँबोज यांच्यासोबतच्या भेटीवर बोलताना बावनकुळे म्हणाले की, सामाजिक व पारिवारिक कार्यक्रमांना सर्वजण जातात. अदानी-अंबानी यांच्याकडेही जातो, तसेच छोट्या कार्यकर्त्यांकडे गेलो तर त्यात गैर काही नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विजय वडेट्टीवार यांच्या महिला संदर्भातील वक्तव्यावर टीका करत, कोणाच्याही कुटुंबात संशय निर्माण करणारे वक्तव्य करणे अयोग्य आहे. माहिती असल्यास ती सरकारकडे द्यावी, असे त्यांनी सांगितले. महसूल विभागातील सुधारणांबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, १५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना कायदेशीर करण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील तीन वर्षांत नागरिकांना तहसील कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही, अशा सुविधा उभारण्यात येत आहेत.

## बार्शीत आईकडून ६ महिन्यांच्या बाळाची हत्या

**बार्शी, ता. ३० :** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात एक धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. एका विवाहित महिलेनं आपल्या ६ महिन्यांच्या बाळाची हत्या केल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना २८ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास घडली. संबंधित महिला आशा जाधव (वय २८) हिने घरात कोणी नसताना धारदार वस्तूंचा वापर करून (ब्लेडने) आपल्या लहान बाळावर हल्ला केला. या हल्ल्यात बाळाचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर तिने आपल्या ६ वर्षांच्या मुलीवरही हल्ला केल्याचे समोर आले आहे. मुलीच्या गळ्यावर आणि हातावर गंभीर जखमा झाल्या आहेत. घटनेनंतर महिलेनं स्वतःही दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. शेजाऱ्यांनी ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांना कळवले. कुटुंबीय घरी परतल्यानंतर त्यांनी घरात भीषण दृश्य पाहिले. तातडीने जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या महिला आणि तिची मुलगी यांच्यावर बार्शी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या प्रकरणी महिलेविरुद्ध स्वतःच्या मुलाची हत्या आणि मुलीवर जीवघेणा हल्ला केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून संबंधित वस्तू जप्त केल्या असून पुढील तपास सुरू आहे. महिलेने असे टोकाचे पाऊल का उचलले, यामागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू असून लवकरच अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

## रुपाली चाकणकरांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता

**रायगड, ता. ३० :** महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने आता एक नवे वळण घेतले आहे. केवळ रुपाली चाकणकरांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदासह पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतरही हे प्रकरण थांबले नसून, रुपाली चाकणकर यांच्या अडचणींत मोठी वाढ झाली आहे. विशेष तपास पथकाने आता खरातच्या 'शिवनिका' संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी सुरू केली असून, चाकणकर यांना समन्स बजावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



अशोक खरातच्या कृत्यांचा पर्दाफाश झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांची त्यांच्यासोबत असलेल्या ओळखीमुळे त्या वादाच्या भोवऱ्यात अडकल्या आहेत. मात्र, शिवसेना (ठाकरे गट) नेत्या सुषमा अंधारे यांनी केलेल्या खळबळजनक आरोपांनी या प्रकरणाला वेगळेच वळण दिले आहे. सुषमा अंधारे यांनी चाकणकर आणि सुनील तटकरे यांचे 'व्यावसायिक कनेक्शन' उघड केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रायगडमधील रोहा येथे निलेश चाकणकर आणि आकाश चौधरी यांची बांधकाम व्यवसायात भागीदारी आहे. 'कर्मा कन्स्ट्रक्शन एलएलपी' च्या माध्यमातून त्यांनी रोठ खुर्द येथे एक बहुमजली इमारत उभी केली आहे. या बांधकामाविरोधात भाजपचे बबलू सय्यद यांनी न्यायालयात याचिकाही दाखल केली असून, हे बांधकाम अनधिकृत असल्याचा दावा केला आहे. आकाश चौधरीच्या नावावर रिव्हर राफ्टिंगपासून ते रिसॉर्टपर्यंत अनेक मोठे व्यवसाय नोंदणीकृत आहेत, जे आता तपासाच्या परिघात आले आहेत. चौधरी हे तटकरेंचे भागीदार असून तेच चाकणकरांचेही भागीदार असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधान आले आहे.

## पुणे–सोलापूर–साताऱ्यात बनावट मद्याचे मोठे रॅकेट उघड

**पुणे, ता. ३० :** दिसायला नामांकित ब्रँडची चकचकीत बाटली, पण आत स्वस्त दराची कच्ची दारूग्राहकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा बनावट मद्य रॅकेटचा राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठा पर्दाफाश केला आहे. ही कारवाई इंदापूर तालुक्यातील कांदलगाव येथे फिल्मी स्टाईल पाठलाग करून करण्यात आली. या रॅकेटचे धागेदोरे सोलापूर आणि सातारा जिल्ह्यांपर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे.

तपासात उघड झाले की, टोळी गोव्यातून स्वस्त दरातील मद्य मोठ्या प्लास्टिक ड्रममध्ये भरून छुप्या मार्गाने महाराष्ट्रात आणत होती. त्यानंतर विविध अड्ड्यांवर 'रॉयल स्टॅग' आणि 'इम्पेरियल ब्ल्यू' यांसारख्या नामांकित ब्रँडच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये ही दारू भरून ती बाजारात विकली जात होती.



विशेष म्हणजे, या टोळीने बनावट बुच आणि सीलची मोठी साठवणूक करून ठेवली होती. त्यामुळे बाटली पाहून ती बनावट आहे हे ओळखणे सामान्य ग्राहकांसाठी जवळजवळ अशक्य होत होते. या मार्गाने बनावट मद्य चढ्या दराने विकून टोळी लाखो रुपयांची कमाई करत होती.

उत्पादन शुल्क विभागाने कांदलगाव-शहा रस्त्यावर सापळा रचून संशयास्पद मालवाहू गाडी थांबवली. तपासणीदरम्यान गाडीतून २५ प्लास्टिक ड्रममध्ये भरलेले मद्य आणि तब्बल१,४०० बनावट बुचे जप्त करण्यात आले. या कारवाईत प्रेम भडवलकर आणि अक्षय देशमुख यांना अटक करण्यात आली असून, सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या घटनेमुळे राज्यात बनावट मद्याच्या वाढत्या धोक्याबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, ग्राहकांच्या सुरक्षेसाठी अशा रॅकेट्सवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## भाजपची काँग्रेस झाली तर संघ १० नवीन भाजप उभ्या करेल

### शरद पोंक्षेंचे खळबळजनक वक्तव्य

**नागपूर, ता. ३० :** मराठी अभिनेते व व्याख्याते शरद पोंक्षें यांनी नागपुरातील व्याख्यानमालेत भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नातेसंबंधांवर भाष्य करताना केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. भाजपची अवस्था काँग्रेससारखी झाली, तर अशा दहा नवीन भाजप उभ्या करण्याची ताकद संघात आहे, असे ठाम विधान त्यांनी केले.

नागपुरातील रेशीमबाग येथे राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित रामस्मरण व्याख्यानमालेत भारत एक हिंदू राष्ट्र या विषयावर बोलताना पोंक्षे यांनी हे मत मांडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयाजवळच झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी सत्ताधारी पक्षाला थेट इशारा देत अहंकार टाळा आणि



मूळ विचारधारेपासून दूर जाऊ नका, असे सांगितले.

पोंक्षे म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजपची जननी आहे. सत्ता ही कायमची नसते. आज परिस्थिती अनुकूल असली, तरी जर पक्षाने आपली मूलभूत हिंदुत्ववादी भूमिका सोडली, तर संघ नव्या राजकीय पर्यायांची उभारणी करू शकतो.

त्यांनी पुढे सांगितले की, देशात आज हिंदू सण-उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होत आहेत, याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संघ परिवाराला जाते. मात्र, आम्हाला कोणीच हरवू शकत नाही ही मानसिकता कोणत्याही पक्षासाठी धोकादायक ठरू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

पोंक्षे यांच्या या वक्तव्यामुळे संघ-भाजप नातेसंबंध, तसेच सत्ताधारी पक्षाच्या कार्यपद्धतीवर नव्याने चर्चा सुरू झाली असून, त्यांच्या भाषणाचे राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## फुरसुंगी येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांची २६ वर्षांनंतर पुन्हा भरली शाळा

**फुरसुंगी, ता. ३० :** आयुष्यातील सर्वात सुंदर टप्पा मानल्या जाणाऱ्या शालेय जीवनाच्या आठवणींना पुन्हा उजाळा देणारा अविस्मरणीय क्षण फुरसुंगी येथे अनुभवायला मिळाला. सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा तब्बल २६ वर्षांनंतर स्नेहमेळावा उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. हा मेळावा फुरसुंगी येथील न्यू इंग्लिश स्कूल या शाळेत २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला होता. शाळा सुटल्यानंतर शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे एकमेकांपासून दूर गेलेले विद्यार्थी सोशल मीडियाच्या माध्यमातून पुन्हा संपर्कात आले. दोन वर्षांपूर्वी काही माजी विद्यार्थ्यांनी व्हॉट्सॲप ग्रुप तयार करून जुन्या सहाध्यायांचा शोध घेण्यास सुरुवात केली. हळूहळू एक-एक मित्र ग्रुपमध्ये जोडला जात गेला आणि काही महिन्यांतच तब्बल १०० ते १५० माजी विद्यार्थी पुन्हा एकमेकांच्या संपर्कात आले. याच ग्रुपमधून स्नेहमेळावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या दिवशी शाळेत पाऊल ठेवताना अनेकांच्या मनात उत्सुकता आणि थोडीशी भीतीही होती.आपण एकमेकांना ओळखू का? पण शाळेच्या आवारात एकत्र आल्यानंतर काही क्षणांतच वातावरण जुनेच झाले. शाळेच्या वर्गात पुन्हा बाकांवर बसल्यावर



जणू वेळ मागे फिरल्याचा भास सर्वांना झाला. काहींनी तर आज पुन्हा दहावीचा वर्ग भरल्यासारखे वाटत आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

या स्नेहमेळाव्याला शाळेचे प्राचार्य अनिल हरपळे यांच्यासह पवार, नामदास, तक्ते, इंगळे, देशमुख, सोनवणे, पांगारे, रासकर, शिरापूरे, जगताप, नवले, इनामदार, खोमणे आणि पवार मॅडम आदी माजी शिक्षक उपस्थित होते. २६ वर्षांनंतर आपल्या विद्यार्थ्यांना पुन्हा वर्गात पाहून शिक्षकांच्याही भावना दाटून आल्या. विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत मोठ्या पदांवर कार्यरत आहेत, हे पाहून आम्हाला अभिमान वाटतो, असे शिक्षकांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परिचयाने झाली. त्यानंतर अनेकांनी मनोगत व्यक्त करत शालेय जीवनातील गमती-जमती, खोड्या, शिक्षकांकडून मिळालेला मार, परीक्षेचा ताण आणि त्या काळातील निरागस मैत्री यांची आठवण सांगितली. या आठवणींनी वातावरणात हशा आणि भावनिक क्षण दोन्ही निर्माण केले. संगीत खुर्ची, खो-खो यांसारखे खेळ आयोजित करण्यात आले. या खेळांमध्ये सहभागी होताना सर्वांनी काही काळासाठी आपण पालक, अधिकारी किंवा व्यावसायिक आहोत हे विसरून पुन्हा बालपणाचा आनंद घेतला. मैदानावर धावताना आणि मित्रांना चिडवत खेळताना जुन्या आठवणी ताज्या झाल्या.

दरम्यान, माजी विद्यार्थ्यांनी सर्व उपस्थित शिक्षकांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. आज आम्ही समाजात जे काही आहोत, ते शाळेने दिलेल्या शिक्षण व संस्कारांमुळेच शक्य झाले, अशी कृतज्ञ भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्नेहमेळाव्यात सहभागी झालेले विद्यार्थी आज राजकारण, उद्योग, शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक आणि शासकीय सेवेत कार्यरत आहेत. काही जण उद्योजक, काही शिक्षक, तर काही सरकारी सेवेत उच्च पदांवर आहेत. आपल्या क्षेत्रात त्यांनी वेगळा ठसा उमटवला असल्याचा अभिमान शिक्षकांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर मित्रमैत्रिणींनी एकत्र फोटो काढत या खास दिवसाच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद केल्या. सायंकाळी पाच वाजता संपणारा कार्यक्रम रात्री सात वाजेपर्यंत रेंगाळला. यावरूनच या भेटीची ओढ आणि आनंद किती होता हे स्पष्ट झाले.

### पुढेही भेटत राहण्याचा संकल्प

मेळाव्याच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थ्यांनी यापुढेही नियमितपणे भेटत राहण्याचा आणि शाळेच्या विकासासाठी एकत्रितपणे मदत करण्याचा संकल्प केला. आयोजकांचे आभार मानत सर्वांनी एकमेकांना पुन्हा लवकरच भेटण्याचे आश्वासन दिले. २६ वर्षांनंतर भरलेला हा दहावीचा वर्ग, शिक्षक-विद्यार्थ्यांची पुनर्भेट आणि जुन्या आठवणींना मिळालेला उजाळाया सगळ्यामुळे हा स्नेहमेळावा उपस्थितांसाठी आयुष्यभर जपून ठेवण्यासारखा ठरला.

# राज्यातील शाळांना दोन मे पासून उन्हाळी सुट्टी जाहीर

**पुणे, ता. ३० :** राज्यातील शालेय शिक्षण विभागाने आगामी शैक्षणिक वर्षासाठी काही महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. एप्रिल महिन्यात चालू शैक्षणिक वर्ष संपणार असून जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुट्टीबाबतही स्पष्ट माहिती देण्यात आली आहे.



प्राथमिक शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, राज्यातील शाळांना २ मे २०२६ पासून उन्हाळी सुट्टी लागू होणार आहे. ही सुट्टी १४ जून २०२६ पर्यंत राहणार असून १५ जून २०२६ पासून नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात होईल. या निर्णयामुळे राज्यातील सर्व शाळांमध्ये एकसमान वेळापत्रक ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून सुरुवातीच्या काही दिवसांत विशेष बदल करण्यात आले आहेत. १५ जून ते २९ जून या कालावधीत शाळा सकाळच्या सत्रात चालवण्यात येणार आहेत. या दरम्यान शाळांची वेळ सकाळी ७.०० ते ११.४५ अशी असेल. ३० जून पासून शाळा पुन्हा नियमित वेळेनुसार सुरू करण्यात येतील. शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी हे नियम लागू असतील. इतर मंडळांच्या शाळांनी त्यांच्या वेळापत्रकानुसार निर्णय घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे. विशेषतः विदर्भातील वाढत्या तापमानाचा विचार करून सकाळच्या सत्राचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बदलांमुळे विद्यार्थ्यांना उष्णतेपासून दिलासा मिळेल आणि अभ्यासही सुरळीत सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शाळा प्रशासनाने या सूचनांचे पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# अशोक खरात बड्या अधिकाऱ्यांना एकमेकांच्या बायकांशी संबंध ठेवायला सांगायचा

## विजय वडेट्टीवार यांचा आरोप

**नाशिक, ता. ३० :** नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अशोक खरात याचे अनेक आमदार, खासदार, मंत्री, बडे अधिकारी यांच्याशी लागेबांधे असल्याचेही उघड झाले. अशातच काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. अशोक खरात हा बड्या अधिकाऱ्यांच्या पत्नींना एकमेकांसोबत शेअर करायला लावत होता, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. या प्रकरणामुळे महाराष्ट्राची अस्मिता आणि इज्जत वेशीवर टांगली गेल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली.



वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, अनेक मंत्री, आमदार आणि आयएएस-आयपीएस दर्जाचे मोठे अधिकारी या भोंदूच्या संपर्कात होते. मोठ्या अधिकाऱ्यांच्या बायका खरातच्या केबिनमध्ये असायच्या आणि हे अधिकारी बाहेर ताटकळत बसलेले असायचे. या भोंदूने अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकमेकांच्या फॅमिली शेअर करायला लावल्याचे नवीन प्रकरण आता समोर येत आहे. हे अत्यंत घाणेरडे स्वरूप असून यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन झाली आहे.

या प्रकरणात केवळ अंधश्रद्धा नसून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, खरातच्या पेनड्राइव्हमध्ये १००० पेक्षा जास्त व्हिडिओ आहेत. काळा पैसा पांढरा करून देणारे चेहरे या बाबाच्या सोबत दिसत आहेत. कदाचित हा भोंदू बाबा मंत्र्यांचा पैसा पांढरा करण्याचा धंदा करत असावा. या प्रकरणाची व्याप्ती पाहता केवळ एसआयटीचौकशी पुरेशी नाही, तर याची चौकशी सीबीआय किंवा ईडीमार्फत व्हायला हवी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

राज्यात झालेल्या सत्तांतरात आणि पक्षफुटीमध्येही खरातचा सक्रिय हात असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात आहे. यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, पुराव्याशिवाय बोलणे योग्य नाही, परंतु भाजपच्या काळात अशा भोंदूगिरीला आणि अंधश्रद्धेला प्रचंड पेव फुटले आहे. लोकांची दिशाभूल करून त्यांना मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यासाठी ही एक प्रकारची फॅक्टरी सुरू करण्यात आल्याचा घणाघात त्यांनी केला

मार्च एंडिंगच्या निमित्ताने मंत्रालयातून निघणाऱ्या जीआरवरही वडेट्टीवार जोरदार टीका केली. एका दिवसात १००-१०० जीआर काढले जात आहेत. मर्जीतील कॅान्ट्राटदारांना कमिशन घेऊन पैसे वाटले जात आहेत. २५ कोटींच्या बिलासाठी ३५ कोटींचे वाटप सुरू असून, मंत्रालय आता सामान्य माणसाचे राहिले नसून लुटारूंच्या टोळीचे केंद्र झाले आहे, असा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला.

# दौंडमध्ये कोयत्याने केलेल्या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी

**दौंड, ता. ३० :** किरकोळ वादातून संतप्त झालेल्या तरुणाने कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना दौंड शहरातील कस्तान चाळ परिसरात २६ मार्च रोजी घडली. या हल्ल्यात २३ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला आहे. तर तिघांविरुद्ध दौंड पोलिस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




विनायक हनुमंत मोहिते असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्यांच्यावर सध्या पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर जॉन राजू शिंदे, गणेश साईनाथ बनसोडे आणि प्रणव संतोष अहिरे या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११०, ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विनायक मोहिते हे दौंडहून पुण्यातील पोस्ट कार्यालयात तात्पुरत्या नोकरीवर कार्यरत आहेत. २६ मार्च रोजी राम नवमीच्या कार्यक्रमानिमित्त ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे गेले असता मित्र वाल्मिक तांबे व त्याच्यासोबत असलेल्या आरोपींशी त्यांची भेट झाली. यावेळी मोहिते आपल्या मावस बहिणीच्या लग्नाचे निमंत्रण देत असताना जॉन शिंदे व प्रणव अहिरे यांनी विनाकारण शिवीगाळ केली.

दुसऱ्या दिवशी मध्यरात्री सुमारे साडेबारा वाजता मोहिते पेट्रोल भरण्यासाठी जात असताना कस्तान चाळ येथे आरोपी पुन्हा भेटले. पूर्वी झालेल्या वादाबाबत चर्चा करत असताना पुन्हा शिवीगाळ सुरू झाली. यावेळी जॉन शिंदे याने गणेश बनसोडेला कोयता आणण्यास सांगितले.

यानंतर जॉन शिंदेने कोयत्याने मोहिते यांच्या डोक्यावर वार केला. स्वतःचा बचाव करताना त्यांच्या हातावरही गंभीर जखमा झाल्या. रक्तबंबाळ अवस्थेत मोहिते तेथून पळून वडार गल्ली येथे पोहोचले.

या घटनेनंतर स्थानिकांनी त्यांना तातडीने दौंडमधील खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथून पुढील उपचारासाठी प्रथम ससून रुग्णालय आणि नंतर पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध जीवघेणा हल्ला, मारहाण व धमकी यांसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक बिद्री करत आहेत.

# रामनवमीच्या मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादात तरुणावर कोयत्याने वार

**पुणे, ता. ३० :** पुण्यातील घोरपडी परिसरात रामनवमीच्या मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सणाच्या उत्साहावर पाणी फिरले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा सुरू असतानाच ही घटना घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ८:३० वाजता बी. टी. कवडे रोड परिसरात रामनवमीच्या मिरवणुकी दरम्यान बॅनर लावण्यावरून दोन गटांमध्ये वाद झाला. सुरुवातीला हा वाद किरकोळ स्वरूपाचा होता, मात्र नंतर तो वाढत गेला. रात्री सुमारे ११ वाजता आरोपींनी मुंढवा परिसरातील जाधव वस्ती येथे काही तरुणांना गाठून त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अक्षय गवळी हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. आरोपींनी धारदार शस्त्राने त्याच्यावर वार केले. या हल्ल्यात त्याच्या शरीरावर ७० पेक्षा जास्त टाके पडल्याची माहिती मिळत आहे. त्याची प्रकृती गंभीर असून सध्या त्याच्यावर पुण्यातील केईएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी अजिंक्य गवळी यांच्या तक्रारीवरून काशीराम मोघे, अभिषेक मोघे, नंदू थोरात आणि इतर ३ अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान, या घटनेचे काही सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून त्यामध्ये अनेक तरुण रस्त्यावर एकत्र येऊन हाणामारी करत असल्याचे दिसत आहे. या प्रकारामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली असून पोलिसांनी अधिक कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.





Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ

# तुमच्याही मुलाला बद्धकोष्ठतेचा त्रास सतावतोय का? जाणून घ्या यावरील साधे सोपे उपाय



मुलांमध्ये बद्धकोष्ठता ही एक सामान्य समस्या आहे, ज्यामध्ये शौचास कमी वेळा होते किंवा शौच कडक आणि कोरडे होते. चुकीच्या आहार सवयी, डिहायड्रेशन (शरीरातील पाण्याची कमतरता) किंवा शौच रोखून धरण्याची सवय ही सहसा याची कारणे असतात. मुलांमधील बद्धकोष्ठता सहसा तात्पुरती असली तरी, ती अनेकदा वेदनादायक आणि त्रासदायक असू शकते. याच्या व्यवस्थापनामध्ये सामान्यतः आहारात फायबरचे प्रमाण वाढवणे, पुरेसे पाणी पिणे, शौचास जाण्याची नियमित सवय लावणे आणि डॉक्टरांनी शिफारस केल्यास रेचक औषधे घेणे यांचा समावेश असतो. येथे याची लक्षणे, कारणे, पालकांसाठी सूचना आणि उपचार न केल्यास होणाऱ्या संभाव्य परिणामांवर अधिक सविस्तर माहिती दिली आहे.

लहान मुलांमधील बद्धकोष्ठतेची ही आहेत संभाव्य कारणे

१. आहारात फायबरचे प्रमाण कमी असणे आणि पुरेसे पाणी न पिणे यामुळे बद्धकोष्ठता होऊ शकते.

२. प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे अतिसेवन केल्याने देखील बद्धकोष्ठता होऊ शकते, कारण त्यामध्ये फायबर आणि इतर आवश्यक पोषक तत्वांचे प्रमाण कमी असते.

३. बैठी जीवनशैली पचनक्रिया आणि शौचाची क्रिया मंदावू शकते. इतर गोष्टींमुळे लक्ष विचलित झाल्याने किंवा शौचालयात जाण्याच्या भीतीमुळे मुले शौचास जाण्याची इच्छा दुर्लक्षित करू शकतात.

४. तणाव आणि वेळापत्रकातील बदल, जसे की घर बदलणे, शाळा सुरू करणे किंवा कौटुंबिक समस्या, मुलांच्या शौचाच्या सवयींवर परिणाम करू शकतात.

५. हायपोथायरॉईडीझम किंवा पचनसंस्थेच्या इतर समस्यांसारख्या काही परिस्थितींमुळे देखील बद्धकोष्ठता होऊ शकते.

पालकांनी याबाबत काय करणे गरजेचे आहे

लहान मुलांमधील बद्धकोष्ठतेची बहुतेक प्रकरणे तात्पुरती असतात आणि जीवनशैली व आहारात बदल करून त्यावर नियंत्रण मिळवता येते.

आहारात तंतुमय पदार्थांचे प्रमाण वाढवा. फळे, भाज्या, कडधान्ये आणि संपूर्ण धान्याचे तृणधान्य किंवा ब्रेड यांसारखे तंतुमय पदार्थांनी समृद्ध असलेले अन्न द्या.

मुलांना भरपूर पाणी पिण्यास प्रोत्साहित करा. एक महिन्यापेक्षा जास्त वयाच्या बाळांसाठी, सफरचंद किंवा नाशपातीच्या रसाचे थोडेसे प्रमाण शौचास नरम करण्यास मदत करू शकते, कारण त्यात नैसर्गिकरित्या सॉर्बिटॉल असते. बद्धकोष्ठता निर्माण करणारे पदार्थ मर्यादित करा: प्रक्रिया केलेले पदार्थ, फास्ट फुड आणि जास्त प्रमाणात पूर्ण दूध किंवा चीज यांचे सेवन कमी करा, ज्यामुळे बद्धकोष्ठता होऊ शकते.

# खामगाव फाटा ते खामगाव रस्त्याची दुरावस्था; नागरिकांची रस्ता दुरुस्तीची मागणी

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ३० : दौंड तालुक्यातील महत्त्वाच्या असलेल्या रस्तापैकी एक असलेल्या खामगाव फाटा ते खामगाव रस्त्याची दुरावस्था झाली असून दौंड तालुक्यातील रेल्वे पलीकडे आलेल्या गावांना पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाशी तसेच पुरंदर, दौंड व शिरूर तालुक्यासह पुणे सोलापूर महामार्गाच्या उत्तर व दक्षिण बाजूला असलेल्या अनेक गावांना जोडणारा प्रमुख रस्ता म्हणून खामगाव फाटा ते खामगाव रस्ता हा महत्वाचा मानला जातो.



पुणे सोलापूर महामार्गावरून रेल्वे क्रॉसिंग करून उत्तर बाजूला असलेल्या अनेक शेतकऱ्यांना आपली अवजड वाहने नेहा करण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा असून खामगाव , राहू, तांबेवाडी, उंडवडी , लडकतवाडी, तांबेवाडी, पिंपळगाव आदी भागातील अनेक जण शेती, नोकरी व विविध कामांसाठी या मार्गावरून जात असतात तर अनेक विद्यार्थी शाळेसाठी खामगाव , उरुळी कांचन, हडपसर, पुणे सारख्या ठिकाणी शिक्षणासाठी दैनंदिन ये - जा करत असतात परंतु पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गापासून सुरू होणाऱ्या रस्त्यावर अनेक ठिकाणी लहान मोठे खड्डे पडलेले असून खड्डे चुकविताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे तर दुचाकी स्वरांना जीव धोक्यात घालून वाहने चालवावी लागत आहेत. खामगाव परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा व रेल्वे क्रॉसिंग असल्याने या रस्त्यावरून दररोजच अनेक वाहने ये - जा करत असल्याने या रस्त्यावर सतत रहदारी असते परंतु सध्या रस्त्याची दुरवस्था झाली असून खड्डे पडले असून दोन्ही बाजूला असलेल्या साईट पट्यांची देखील दुरावस्था झालेली असल्याने वाहन चालवणे जिकिरीचे बनले आहे. सातत्याने रस्त्यावर अपघाताचे प्रकार घडत असून या रस्त्यावर रेल्वे गेट असल्याने अनेक वेळा यामुळे आवश्यक ठिकाणी पोचण्यासाठी उशीर होत असल्याने अनेक वेळा अपघात घडत आहे तर अनेकांना पाठीचे आजार निर्माण होत आहेत.

खामगाव - गाडामोडी मार्गे पुणेसह हवेली, दौंड, शिरूर, पुरंदर तालुक्यात जाणाऱ्या नागरिकांना हा जवळचा मार्ग असून या रस्त्याचा बोजवारा उडाल्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे या रस्त्याकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याने प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे तरी खामगाव फाटा ते खाम गाव रस्त्याची व साईट पट्ट्यांची लवकरात लवकर दुरुस्ती व्हावी तसेच खामगाव फाटा येथील रेल्वे उड्डाणपूल लवकरात लवकर व्हावा अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## रुपाली चाकणकरांचा पाय आणखी खोलात


**नाशिक, ता. ३० :** दोन दिवसांपूर्वी ठाकरे सेनेच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी रुपाली चाकणकर आणि आकाश चौधरी यांचे व्यावसायिक कनेक्शन उघड करीत थेट सुनील तटकरे यांच्यावर आरोप केले होते.

याबाबत आता मोठी माहिती पुढे आलीय. तटकरे यांचे होमग्राऊंड असलेल्या रायगड मधील रोह्यात निलेश चाकणकर आणि आकाश चौधरी हे बांधकाम व्यवसायात एकत्र असल्याची माहिती उघड झालीय.आकाश चौधरी आणि निलेश चाकणकर यांनी पार्टनरशिपमध्ये कर्मा कन्स्ट्रक्शन LLP च्या माध्यमातून रोह्याच्या रोठ खुर्द याठिकाणी बहुमजली इमारत उभी केलीय. रुपाली चाकणकर आणि आकाश चौधरी यांच्या रोह्यातील इमारत बांधकाम प्रकरणी भाजपचे अल्पसंख्यांक सेलचे महाराष्ट्र प्रदेश सचिव बबलू सय्यद यांनी माणगाव कोर्टात याचिका देखील दाखल केली आहे.

# अशोक खरात कांड म्हणजे मोठं रॅकेट

## रुपाली चाकणकरांना थेट अटक करा; रोहिणी खडसेंची मागणी

**मुंबई, ता. ३० :** नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या अशोक खरात प्रकरणाने राज्यातील अंधश्रद्धा, लैंगिक शोषण आणि प्रभावशाली लोकांच्या कथित सहभागाबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. या प्रकरणाची व्याप्ती वाढत असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी थेट अटक करण्याची मागणी करत तपासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



खरात प्रकरणात अनेक महिलांचे शोषण, आर्थिक फसवणूक आणि धार्मिक आडोशात चालणाऱ्या गैरप्रकारांचे आरोप समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर एसआयटीमार्फत तपास सुरू असून, काही संबंधितांना समन्स बजावण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षांनाही या तपासात समन्स पाठवण्यात आल्याची चर्चा आहे, ज्यामुळे प्रकरण अधिक संवेदनशील बनले आहे.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर स्पष्ट भूमिका मांडली. त्यांनी म्हटले की, हे केवळ एक व्यक्तीपुरते मर्यादित प्रकरण नसून एक मोठे रॅकेट असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे केवळ समन्स देण्यापेक्षा थेट अटक करून चौकशी करणे गरजेचे आहे, जेणेकरून आरोपींना पुरावे नष्ट करण्याची संधी मिळणार नाही.


या मागणीमागे एक मोठा मुद्दा दडलेला आहे. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये वेळेवर कडक कारवाई झाली नाही, तर पुरावे नष्ट होण्याची शक्यता वाढते आणि तपास कमकुवत होतो. त्यामुळे तपास यंत्रणांनी जलद आणि प्रभावी पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणामुळे समाजात अंधश्रद्धेच्या नावाखाली होणाऱ्या शोषणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. नागरिकांनी अशा व्यक्तींवर आंधळा विश्वास ठेवण्यापेक्षा जागरूक राहणे, तसेच कोणत्याही गैरप्रकाराची तक्रार त्वरित करणे आवश्यक असल्याचा संदेश या घटनांमधून पुढे येत आहे.

# चार महिन्यांपासून फरार आरोपी सोहेल जमादार अखेर जेरबंद

**पुणे, ता. ३० :** वानवडी परिसरातील फसवणुकीच्या गुन्ह्यात मागील तीन ते चार महिन्यांपासून पोलिसांना चकवा देत फरार असलेला आरोपी सोहेल समीर जमादार (वय २७) याला अखेर गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाने कोंबिंग ऑपरेशनदरम्यान अटक केली. या कारवाईमुळे पोलिसांच्या सातत्यपूर्ण शोधमोहीमेला मोठ यश मिळाले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार २८ मार्च २०२६ रोजी वानवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत विशेष कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येत होते. या वेळी गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचत हांडेवाडी रोड, गंगा विलेज परिसरातून आरोपीला अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले.

सोहेल जमादार याच्याविरुद्ध वानवडी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४), ३५१(२) तसेच भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत गुन्हा नोंद आहे. आरोपीने एका रिक्षाचालकाला खोटी टॅक्स पावती बनवून आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप आहे. तसेच इतर नागरिकांनाही अशाच प्रकारे गंडा घातल्याची माहिती तपासात समोर आली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी सतत ठिकाण बदलत राहिल्याने तो पोलिसांच्या हातात लागत नव्हता. मात्र कोंबिंग ऑपरेशनदरम्यान गुन्हे शाखेने अचूक माहितीच्या आधारे त्याला गाठत अखेर अटक करण्यात यश मिळवले. अटक आरोपी सोहेल जमादार याला पुढील कायदेशीर कारवाईसाठी वानवडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, गुन्हे शाखेच्या पथकाचे कौतुक करण्यात येत आहे.



# अमेरिकेत ट्रम्पविरोधात आंदोलन

**नवी दिल्ली, ता. ३० :** जगात युद्धाचा भडका उडालाय, पण हे युद्ध आता रणांगणापुरतं मर्यादित राहिलेलं नाही. ज्यांनी जगावर युद्ध लादलं, त्यांच्याच खुर्च्या आता धोक्यात आल्यात. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्पविरोधात तब्बल ९० लाख नागरिक नो किंग्स आंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावर उतरले.तर इस्त्रायलमध्येही पंतप्रधान नेत्यानाहूंविरोधात नो वॉरचे नारे घुमतायत, त्यामुळे आपल्याच देशात ट्रम्प आणि नेत्यानाहू एकटे पडल्याचं दिसतंय. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील हुकूमशाहीविरोधात हे तिसरं आंदोलन आहे.

नो किंग्सची अमेरिकेत ३ हजार ठिकाणी आंदोलन होण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांची धोरणं, वाढती महागाई तसेच इराणसोबतचे युद्ध या मुद्दावरून नागरीकांकडून आंदोलन करण्यात आलं.दुसरीकडे फक्त अमेरिकाच नाही, तर इस्त्रायलची राजधानी तेल अवीव सुद्धा आंदोलनांनी पेटलीय.. पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्या विरोधात लाखो नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. आम्हाला युद्ध नको, शांतता हवी, म्हणत इस्त्रायली जनता आपल्याच सरकारला जाब विचारतेय.

# साताऱ्याचे पोलीस अधीक्षक तुषार दोशी सक्तीच्या रजेवर

**सातारा, ता, ३० :** साताऱ्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून धगधगणाऱ्या जिल्हा परिषद निवडणूक राडा पोलीस अधीक्षकाला चांगलाच भावला आहे. सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यांच्या जागी आता अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर यांच्याकडे जिल्ह्याची धुरा सोपवण्यात आली आहे.



शिवसेनेचे मंत्री शंभुराज देसाई आणि इतर नेत्यांनी आरोप केला की, पोलिसांनी शिवसेनेच्या दोन सदस्यांना मतदानापासून रोखण्यासाठी बळाचा वापर केला. इतकेच नव्हे तर खुद्द मंत्र्यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः पोलीस अधीक्षकांना फोन करून सदस्यांना मतदानापासून रोखू नका, अशी विनंती केली होती. मात्र, प्रशासनाने मंत्र्यांच्या शब्दालाही केराची टोपली दाखवत सदस्यांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले. याबद्दल शिंदेंनी हा लोकशाहीचा हा खून आहे, अशा शब्दांत संताप व्यक्त केला होता.

तुषार दोशी यांच्या निलंबनाची मागणी झाली, पण ते पुन्हा रुजू झाले होते. मात्र, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या थेट नाराजीनंतर अखेर त्यांना रजेवर जावे लागणार असून अधिक कारवाई करून पुढील कारवाई केली जाणार आहे. २०२६ च्या सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडणुकीत फोडाफोडीच्या राजकारणाने टोक गाठले होते. ६५ जागांसाठी शिवसेना-राष्ट्रवादी युतीकडे ३५ जागांचे बहुमत असतानाही, भाजपने ६ सदस्य फोडून सत्ता मिळवली होती.

# पुणे एअरपोर्टवर २६ कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**पुणे, ता. ३० :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत तब्बल २६ कोटी ८० लाख रुपयांचा हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला असून, चिनी खाद्यपदार्थ म्हणून लपवून हा माल थेट थायलंडहून पुण्यात पाठवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




ही कारवाई पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळयेथीलएअरकार्गोसंकुलात करण्यात आली. कागदपत्रांवर मालाचे वर्णन मँडरिन ऑरेंज सॅक्स असे करण्यात आले होते. पांढऱ्या थर्माकोल बॉक्समध्ये पॅक केलेल्या या कंटेनरची स्कॅनिंगदरम्यान प्रतिमा संशयास्पद दिसल्याने अधिकाऱ्यांनी बॉक्स उघडून तपासणी केली.

बॉक्समध्ये सीलबंद टिनच्या डब्यांमध्ये वरच्या बाजूला मिठासारखी पांढरी पावडर भरून ठेवली होती. ही पावडर बाजूला केल्यावर खाली व्हॅक्युम-सीलबंद पाकिटांमध्ये लपवलेला ७६.५८ किलो उच्च प्रतीचा हायड्रापोनिक गांजा सापडला.

हायड्रोपोनिक गांजा हा मातीविना, नियंत्रित वातावरणात वाढवला जातो. त्यामुळे त्यातील नशिल्या घटकांचे प्रमाण जास्त असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात त्याला मोठी मागणी असते आणि किंमतही प्रचंड असते.

सीमा शुल्क विभागाने या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेतले असून, हा माल नेमका कोणाला पाठवला होता आणि यामागे कोणते आंतरराष्ट्रीय जाळे कार्यरत आहे, याचा तपास सुरू आहे. अलीकडच्या काळात पुणे विमानतळावर हायड्रोपोनिक गांजाच्या तस्करीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने तपास यंत्रणांनी सतर्कता वाढवली आहे.


या कारवाईमुळे पुणे पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करीच्या रडारवर आल्याचे स्पष्ट झाले असून, शहरातील ड्रग्ज नेटवर्कबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

# संगमनेर–नऱ्हे रस्त्यावरील अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**विशाल शिंदे**

नसरापूर, ता. ३० : भोर तालुक्यातील संगमनेर-न-हे मार्गावर भरधाव कारने दिलेल्या जोरदार धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला असून त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.





पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २९ मार्च रोजी सकाळी सुमारे ११.१५ वाजण्याच्या सुमारास संगमनेर हद्दीत हा अपघात घडला. राजेश राठोड (वय २१, रा. कोथरूड, पुणे) हा आपल्या मोटारसायकलवरून मित्र स्पंदन बागुल याला घेऊन संगमनेर ते न-हे मार्गाने जात होता. त्यावेळी समोरून येणाऱ्या कारचालकाने बेदरकारपणे व वेगात वाहन चालवत दुचाकीला समोरून जोराची धडक दिली.

या भीषण अपघातात राजेश राठोड याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला. तर स्पंदन बागुल याला पाय, पोट व डोक्याला दुखापत होऊन तो जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी राहुल गोळे (रा. नऱ्हे, ता. भोर) याच्याविरुद्ध राजगड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार मदने करीत आहेत.

## कासुर्डीतील बांधकामाची जेसीबीने तोडफोड

**नसरापूर, ता. ३० :** कासुर्डी (ता. भोर) येथे एका कंपनीच्या मालकीच्या जमिनीवरील बांधकामाची यंत्राच्या सहाय्याने तोडफोड केल्याचा प्रकार समोर आला असून, याप्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक १६३ मधील जागेवर ही घटना घडली.

सदर जमीन शासकीय नियमांनुसार मोजणी करून तिच्या हद्दीत सिमेंट व दगडांचे बांधकाम करण्यात आले होते. तक्रारीनुसार, आरोपीने अनधिकृतपणे जागेत प्रवेश करून खोदकाम यंत्राच्या सहाय्याने बांधकाम पाडून टाकले. या घटनेमुळे संबंधित कंपनीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कात्रजमध्ये प्रियकराकडून गळा आवळून विवाहितेची हत्या

**पुणे, ता. ३० :** पुण्यातील कात्रज परिसरात अनैतिक संबंधातून उद्भवलेल्या वादातून एका तरुणीचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील नवीन कात्रज बोगद्याजवळील दाट झाडीत हा प्रकार घडला असून, आंबेगाव पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.




मनीषा खम्म दमाई (वय २५) असे मृत महिलेचे नाव असून, ती नऱ्हे परिसरात वास्तव्यास होती. या प्रकरणी प्रकाश अर्जुन तिखात्री (वय ३०) याला अटक करण्यात आली आहे. दोघेही मूळचे नेपाळचे असून पुण्यात रखवालदार म्हणून काम करत होते. विशेष म्हणजे, दोघेही विवाहित असून त्यांना मुले आहेत. पोलिसांच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मनीषा आणि प्रकाश यांच्यात काही काळापासून अनैतिक संबंध होते. मात्र प्रकाशने हे संबंध पुढे ठेवण्यास नकार दिल्यानंतर दोघांमध्ये वाद सुरू झाला. मनीषा त्याच्यावर संबंध कायम ठेवण्यासाठी दबाव टाकत होती, असेही समोर आले आहे.

१८ मार्च रोजी प्रकाशने मनीषाला भेटण्याचे आमिष दाखवत तिला कात्रज परिसरात नेले. एका हॉटेलच्या मागील बाजूस असलेल्या दाट झाडीत दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. या वादाच्या भरात प्रकाशने दोरीने तिचा गळा आवळून खून केला आणि तेथून पळ काढला.

मनीषा बेपत्ता झाल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी तक्रार दिली. दरम्यान, त्याच परिसरात एका महिलेचा मृतदेह सापडल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तपास करताना मृतदेहाची ओळख पटली आणि पुढील तपासातून प्रकाशला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक मुलाणी करत असून, शहरात वैयक्तिक वादातून होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याची बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे.